भौतिकोपचार महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत.

एम.एम.पटेल पब्लीक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर संचलित अश्विनी फिजीओथेरपी कॉलेज, मु.पो. कुंभारी, ता/जि. सोलापूर.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: पीएसओ-२०२५/प्र.क्र.३८२/२५(E-१२६८४९१)/२४/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२५.

वाचा : १) शासन निर्णय, क्र.एमईडी-२०१७/प्र.क्र.२१०/१७/शिक्षण-१, दि.२६.१०.२०१७.
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-६/२३४३/२०२४, दि.३०.१२.२०२४.
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.DMER-११०१४/११६/२०२५- CETIT, दि.०८.१०.२०२५.

**प्रस्तावना:**

एम.एम.पटेल पब्लीक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर संचलित अश्विनी फिजीओथेरपी कॉलेज, मु.पो. कुंभारी, ता/जि. सोलापूर या संस्थेचा भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(२) च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत सदर संस्थेची केवळ त्रुटींच्या कारणास्तव शिफारस नाकारून राज्य शासनास सादर केला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यांनी उक्त संस्थेतील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाला परवानगी देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयातील भौतिकोपचार अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून १०० (शंभर) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन, एम.एम.पटेल पब्लीक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर संचलित अश्विनी फिजीओथेरपी कॉलेज, मु.पो. कुंभारी, ता/जि. सोलापूर या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून १०० (शंभर) विद्यार्थी प्रवेश

CamScanner

क्षमतेसह भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम (BPTh) सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) सदर महाविद्यालयातील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १०० इतकी राहील.

२) सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

३) राज्य शासनाने तसेच विद्यापीठाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट, १९८८ चा क्र.६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) संस्थेने उपरोक्त भौतिकोपचार महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

७) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सदरहू संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरण्यात येणार नाहीत.

८) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस संलग्निकरण देण्यापूर्वी व विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

CamScanner

१०) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या शिफारशींच्या आधारे सदर परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रियंका कागिनकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वै. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे(पू), मुंबई.
८. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
९. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई .
१०. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
११. अध्यक्ष/सचिव, एम.एम.पटेल पब्लीक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर
१२. निवडनस्ती (शिक्षण-१).

CamScanner